" स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद " - कर्मवीर

# सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, विद्यानगर, कराड

स्थापना : १९५४

कला, विज्ञान व वाणिज्य (कनिष्ठ व वरिष्ठ) नॅक मानांकन : B+

संस्थापक : पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील, डी.लिट्.

प्राचार्य
डॉ. एम. एम. राजमाने

जा. क्र. ३९५ / ० / २०० / दिनांक ३१/३/०९

## प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, श्री. पाटील सतीश दशरथ हे या कॉलेजच्या सन २००७ - २००८ या वर्षात एम.फिल. (मराठी) पदवी अभ्यासक्रमासाठी नियमित विद्यार्थी होते. त्यांनी ''सुभाष कवडे यांच्या ' शिवारमाती ' व ' निरंजन ' या काव्यसंग्रहांचा अभ्यास'' या टॉपिक (विषय) वर प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंधिका पूर्ण केली आहे. त्यांची प्रबंधिका एम.फिल. परीक्षेसाठी स्वीकारण्यात यावी, अशी शिफारस करण्यात येत आहे.

प्रमुख,
मराठी पदव्युत्तर अध्यापन व संशोधन केंद्र,
कराड.

प्राचार्य,
सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज,
कराड.

स्थळ: कराड.
दिनांक: ~~ए्रिल २००९~~ 31/3/2009

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री. सतीश दशरथ पाटील याने ''सुभाष कवडे यांच्या 'शिवारमाती' आणि 'निरंजन' या काव्यसंग्रहांचा अभ्यास'' या विषयावरील प्रस्तुत प्रबंधिका एम्.फिल्. (मराठी) पदवी परीक्षेसाठी माझ्या मार्गदर्शनाखाली सिध्द केली आहे.

त्याने उपलब्ध साहित्याचा अभ्यास करून आपल्या विषयाची स्वतंत्रपणे मांडणी केली आहे. त्याने केलेले संशोधन हे पूर्णपणे नवे आहे. सदर प्रबंधिकेचे काम पूर्णावस्थेत आहे व ती सादर करण्यास काहीही अडथळा नाही याची मला खात्री वाटते. ही प्रबंधिका अथवा यातील कोणताही भाग पूर्णपणे स्वतंत्र असून यापूर्वी अन्य कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही. म्हणून ती सादर करण्यास अनुमती देत आहे.

स्थळ : **मायणी (सातारा)**

दिनांक :

प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी

मार्गदर्शक

# प्रतिज्ञापत्र

''सुभाष कवडे यांच्या 'शिवारमाती' आणि 'निरंजन' या काव्यसंग्रहांचा अभ्यास'' या विषयावरील सदरची प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल्. (मराठी) पदवी परीक्षेसाठी लिहिलेली आहे. ही प्रबंधिका अथवा यातील कोणताही भाग पूर्णपणे स्वतंत्र असून यापूर्वी अन्य कोणत्याही विद्यापीठीय परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : **कराड**

दिनांक :

**श्री. सतीश दशरथ पाटील**

संशोधक विद्यार्थी

# ऋणनिर्देश

"सुभाष कवडे यांच्या 'शिवारमाती' आणि 'निरंजन' या काव्यसंग्रहांचा अभ्यास" हा विषय मी मराठी विभाग (शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर) तसेच मार्गदर्शक प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून शोध प्रबंधिकेसाठी निश्चित केला.

भिलवडी हायस्कूल भिलवडी येथे कामानिमित्त गेलो असताना श्री. सुभाष कवडे यांची ओळख झाली. त्यांच्या 'शिवारमाती' आणि 'निरंजन' या काव्यसंग्रहाबद्दल माहिती मिळाली. कवडे सरांनी मला हे दोन्ही काव्यसंग्रह वाचनासाठी दिले. माणदेशी निसर्गाचे, ओजाड बोडक्या माळरानाचे, आशावादी अल्पसंतुष्ट माणसांचे चित्रण करणाऱ्या यातील कविता मला आवडल्या. एम्.फिल्.च्या शोध प्रबंधिकेसाठी मी सुरूवातीला "मराठी कथेत प्रतिबिंबीत झालेले माणदेशी समाजजीवनाचे चित्रण" हा विषय निश्चित केला होता. परंतु व्यंकटेश माडगूळकरांच्यावर पीएच्.डी. झाली असल्याने नवीन विषय निश्चित करण्यास सांगण्यात आले आणि मी माणदेशी निसर्गाचे, माणसांचे चित्रण करणाऱ्या कविता शोध प्रबंधिकेसाठी निवडल्या. त्याबाबत मी मार्गदर्शकांबरोबर चर्चा केली.

सुभाष कवडे यांची कविता प्रामुख्याने माणदेशी निसर्गाचे, माणदेशातील सामाजिक जीवनाचे, कष्टकऱ्यांची व्यथा, वेदना मांडणारी, माणदेशातील ग्रामसंस्कृती, विठ्ठलभक्ती निर्देशित करणारी आहे. या कविता मराठी ग्रामीण कवितेतील एक वैशिष्ट्यपूर्ण भाग असल्याने त्यांचा अभ्यास करणे मला गरजेचे वाटले. हा नाविन्यपूर्ण विषय निवडताना मला माझे मार्गदर्शक डॉ. सयाजीराजे मोकाशी यांची खूपच मदत झाली. प्रबंधिका विषय निवडीपासून ती पूर्ण करेपर्यंत डॉ. सयाजीराजे मोकाशी यांचे मौलिक मार्गदर्शक व सहकार्य मला मिळाले. कवी सुभाष कवडे यांच्याकडूनही मला वेळोवेळी आवश्यक ती माहिती मिळाल्याने प्रबंधिका लेखनास प्रोत्साहन मिळत गेले.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

एम्.फिल्. प्रवेशापासून मला सतत मार्गदर्शन करणारे एस्.जी.एम्. कॉलेजचे मराठी विभाग प्रमुख प्रा. संभाजीराव देसाई, प्रा. शोभना रैनाक, प्रा. सरलादेवी निकम, डॉ. रवींद्र पाटील, डॉ. रेश्मा दिवेकर यांनी तसेच प्रा. आर.ए. पाटील (कुसूमताई कन्या महाविद्यालय, इस्लामपूर), प्राचार्या दीपा देशपांडे (आर्टस् अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा) यांचे अतिशय मोलाचे मार्गदर्शन मिळाले. सदगुरू गाडगे महाराज कॉलेजचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने यांचेही मार्गदर्शन मिळाल्याने मी सर्वांच्या सहकार्याबद्दल सदैव ऋणी राहीन.

माझे वडील श्री. दशरथ नामदेव पाटील, आई सौ. शोभा दशरथ पाटील, मामा श्री. सुरेश महादेव पाटील, आजी सखुबाई राजाराम पाटील, तसेच एम्. फिल्. ग्रुपमधील सर्वांनी मला सतत प्रबंधिका पूर्ण करण्याबाबत प्रेरणा दिली, सहकार्य केले, याबद्दल सर्वांचे मी आभार मानतो.

शोध निबंध लेखनासाठी आवश्यक ती संदर्भ पुस्तके मिळवून देण्यात मला अनेकांनी सहकार्य केले. एस्.जी.एम्. कॉलेज कराड मधील ग्रंथपाल, ग्रंथपाल सहाय्यक, के.बी.पी. कॉलेज उरूण इस्लामपूरचे ग्रंथपाल सहाय्यक विजयकुमार तिबिले, मार्गदर्शक डॉ. सयाजीराजे मोकाशी आणि श्री.सुभाष कवडे यांनी आवश्यक ती पुस्तके, लेख मला उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे मी आभार मानतो. तसेच प्रस्तुत प्रबंधिकेची संगणकाद्वारे जुळणी करून टंकलेखन केल्याबद्दल मंगल एजन्सी इस्लामपूर येथील श्री. सुरेंद्र पाटील यांचाही मी आभारी आहे. त्याचबरोबर बायडींग करून देणारे दत्त ऑफसेट कराड यांचेही आभार मानतो. तसेच मला नेहमी प्रोत्साहन देणाऱ्या सहकार्य करणाऱ्या ज्ञात अज्ञातांचा मी सदैव ऋणी राहीन.

वरील सर्वांच्या सहकार्याबद्दल मी पुन्हा एकदा कृतज्ञता व्यक्त करतो. त्यांचे असेच सहकार्य यापुढेही मिळेल अशी आशा बाळगतो.

**सतीश दशरथ पाटील**


श्री सुभाष कवडे

# अनुक्रमणिका



| प्रकरण क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १) | मराठीतील ग्रामीण कविता<br>अ) विषयाचे महत्व आणि प्रबंधिकेचा हेतू<br>ब) मराठीतील ग्रामीण कविता : एक समृध्द जीवनानुभव<br>क) मराठी ग्रामीण कवितेचा आढावा.<br>ड) श्री. सुभाष कवडे यांचे सामाजिक कार्य.<br>इ) वाङ्मयीन चरित्र. | १ ते ५६ |
| २) | 'शिवारमाती' या काव्यसंग्रहाचा अभ्यास<br>अ) माणदेशी निसर्ग<br>ब) कष्टकऱ्यांच्या व्यथा—वेदना<br>क) सामाजिक कविता<br>ड) संतभक्तीपर रचना<br>इ) आशावादी कविता<br>फ) आत्मपर कविता | ५७ ते ९४ |
| ३) | 'निरंजन' या काव्यसंग्रहाचा अभ्यास<br>अ) माणदेशी निसर्ग<br>ब) कष्टकऱ्यांच्या व्यथा-वेदना<br>क) सामाजिक कविता<br>ड) विठ्ठलभक्ती<br>इ) आत्मपर कविता<br>ई) इतर कविता | ९५ ते १३९ |
| ४) | 'शिवारमाती' व 'निरंजन' वाङ्मयीन वैशिष्टये<br>अ) सुभाष कवडे यांच्या कवितांचे स्वरूप<br>ब) सुभाष कवडे यांच्या कवितेचा रचनाबंध<br>क) सुभाष कवडे यांच्या कवितेतील शब्दसौंदर्य<br>ड) सुभाष कवडेंच्या कवितेतील काव्यगुण<br>इ) निवेदन शैली | १४० ते १७१ |
| ५) | उपसंहार | १७२ ते १७८ |
| ६) | परिशिष्ट<br>अ) जीवनपट<br>ब) मुलाखत | १७९ ते १८९ |
| ७) | संदर्भसूची | १९०,१९१ |